लोकमत



गडहिंग्लज येथे नेत्रतज्ज्ञ डॉ. सदानंद पाटणे यांना एम. एल. चौगुले यांच्या हस्ते तिरंगा ध्वज देण्यात आला. यावेळी रवळनाथ व ज्ञानदीप प्रबोधिनीचे संचालक उपस्थित होते.

# 'रवळनाथ'तर्फे जिल्ह्यात हर घर तिरंगा अभियान

## ७०० ध्वज वितरण : स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडहिंग्लज** : स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे 'हर घर तिरंगा अभियान' राबविण्यात आले. या उपक्रमांतर्गत कोल्हापूर, बेळगांव व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नागरिकांना ७०० ध्वज वाटप करण्यात आले.

'रवळनाथ'च्या गडहिंग्लज प्रधान कार्यालयासह कार्यक्षेत्रातील आजरा, गडहिंग्लज, चंदगड, नेसरी, कोल्हापूर, जयसिंगपूर, बेळगांव, निपाणी व कुडाळ या शाखांच्या परिसरातील नागरिकांना तिरंगा रॅलीद्वारे ध्वज वितरित करण्यात आले.

येथील माने हॉस्पिटलनजीक संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांच्याहस्ते रॅली व ध्वज वितरण अभियानाचा प्रारंभ झाला. त्यानंतर डॉक्टर्स कॉलनी, कचेरी रोड व भिकाजीराव मोहिते मार्ग परिसरातील व्यावसायिक व नागरिकांना ध्वज वाटप करण्यात आले. रॅलीत संचालक रामचंद्र निळपणकर, विजय आरबोळे, महेश मजती, संजय चौगुले, शंकर देसाई, मीना रिंगणे, उमा तोरगल्ली, रेखा पोतदार सहभागी झाले होते.

### डॉक्टर, शिक्षक विद्यार्थी सहभागी

तिरंगा रॅलीत झेप अकॅडमी व इन्टेंट करिअर अकॅडमीचे शिक्षक, विद्यार्थ्यांसह डॉ. सदानंद पाटणे, डॉ. चेतन पाटील, डॉ. एम. एस. बेळगुद्री हेही उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.